संदर्भ क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२४-१२०१
सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा
डी-३०१/इ-३०१, सानपाडा रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स,
सानपाडा, नवी मुंबई ४०० ७०५.
दूर.०२२-३५२५२३४६/३४७/३४८/३४९/३५०,
E-mail ID : sgb_sanpada@yahoo.co.in

दिनांक : - ५फेब्रुवारी,२०२४

# आ दे श

**विषय :-** **सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता यामध्ये दि.१.१.२०२४ पासून करण्यांत येणारी सुधारणा व राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना कामगार भरपाई अधिनियम, १९२३ (W.C.) च्या तरतुदी लागू करण्याबाबत.**

सुरक्षा रक्षक मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता आणि घरभाडे भत्ता मंडळाच्या क्र.सुरमं/विभ/अलडो/२०२३-४०५४, दि.३.८.२०२३ च्या आदेशान्वये दि.१ जुलै, २०२३ पासून निर्धारीत केला होता.

सक्षम प्राधिकारी, किमान वेतन अधिनियम, १९४८ यांनी त्यांचे आदेश क्र.ग्रा.वि/कि.वे.अ./विभ/२०२४(१)/कार्या-१०, दि.५.२.२०२४, अन्वये दि.१ जानेवारी २०२४ ते दि.३० जुन २०२४ या कालावधीकरीतां विशेष भत्ता/महागाई भत्याचा दर रु.३,०६८.०० दरमहा निश्चित केलेला आहे. त्या अनुषंगाने मंडळाने दि. ५.२.२०२४ रोजी निर्णय घेऊन मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचा विशेष भत्ता/महागाई भत्ता दि.१ जानेवरी २०२४, ते दि.३० जुन २०२४ या कालावधीकरीतां रु.३,०६८.०० दरमहा इतका केलेला आहे.

मंडळाने नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांना किमान वेतनावर (वेतन व विशेष भत्ता/महागाई भत्ता) २०% दराने घरभाडे भत्ता लागू केलेला आहे. नोंदीत सुरक्षा रक्षक/अधिकारी यांचे प्रवास भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व धुलाई भत्ता यांचे दर मंडळाने आदेश क्र.सुरमं/अध्यक्ष/२०२३-२४६७, दि.१६ मे, २०२३ अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशानुसार असून त्यामध्ये कोणताही बदल केलेला नाही.

मंडळामार्फत कार्यरत सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी हे राज्य कामगार विमा योजनेच्या कक्षेबाहेर गेले आहेत. त्यांचे हित लक्षात घेऊन मंडळाने उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां कामगार भरपाई अधिनियम, १९२३ ची योजना लागू करण्याचा निर्णय घेऊन दि.२.८.२०२३ रोजी ठराव पारित केलेला आहे. सबब, कामगार राज्य विमा योजनेकरीतां उपरोक्त सुरक्षा कर्मचाऱ्यांकरीतां आकारण्यांत येणारी किमान वेतन (मुळ वेतन + महागाई भत्ता), घरभाडे भत्ता, अतिकालीक भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता यावरील आकारण्यांत येणारी ३.२५% लेव्ही कमी करण्यांत आली असून कामगार भरपाई अधिनियम, १९२३ योजनेकरीतां किमान वेतनाच्या १ टक्का लेव्ही आकारण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदर लेव्हीमधील बदल मंडळाच्या ERP प्रणालीत करण्यांत आलेले आहेत.

**सुरक्षा रक्षक/महिला सुरक्षा रक्षक, मुख्य सुरक्षा रक्षक, सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी यांना दि.१.१.२०२४ पासून लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते**

| अ.क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४५.२५ %) रुपये | लेव्ही व (घरभाडे, रजाकाली न प्रवास भत्ता @ ३.२५%) | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक/ म.सु.रक्षक | १३,४५७.०० | ३,०६८.०० | ३,३०५.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,३३०.०० | ७,४७८.०० | १११.०० | ३०,९१९.०० |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १३,७३२.०० | ३,०६८.०० | ३,३६०.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २३,६६०.०० | ७,६०२.०० | ११२.०० | ३१,३७४.०० |
| ३ | सुरक्षा पर्यवेक्षक | १४,४३२.०० | ३,०६८.०० | ३,५००.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,५००.०० | ७,९१९.०० | ११७.०० | ३२,५३६.०० |
| ४ | सहा.सु. अधिकारी | १४,६५७.०० | ३,०६८.०० | ३,५४५.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २४,७७०.०० | ८,०२१.०० | ११८.०० | ३२,९०९.०० |

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४५.२५% दराने व घरभाडे भत्ता, रजाकालीन प्रवास भत्ता व अतिकालीक कामाचा भत्ता यावर ३.२५% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

.....२

Scanned with OKEN Scanner

सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांना दि.१.१.२०२४ पासून लागू करण्यांत आलेले सुधारीत वेतन व भत्ते

| अ क्र | सुरक्षा रक्षकाचा हुद्दा | *मूळ वेतन | *विशेष भत्ता/ महागाई भत्ता | घरभाडे भत्ता | प्रवास भत्ता | रजा कालीन प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | एकूण वेतन व भत्ते | लेव्ही (किमान वेतनाच्या @४३%) रुपये | एकूण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा अधिकारी | १५,१०७.०० | ३,०६८.०० | ३,६३५.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,३१०.०० | ७,८१५.०० | ३३,१२५.०० |
| २ | मुख्य सुरक्षा अधिकारी | १५,५५७.०० | ३,०६८.०० | ३,७२५.०० | २,२००.०० | १००.०० | १,२००.०० | २५,८५०.०० | ८,००९.०० | ३३,८५९.०० |

*** किमान वेतन = मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता**

बृहन्मुंबई व ठाणे जिल्हयातील मुख्य मालकांनी उपरोक्त नोंदीत सुरक्षा पर्यवेक्षक, सहाय्यक सुरक्षा अधिकारी, सुरक्षा अधिकारी व मुख्य सुरक्षा अधिकारी यांच्या किमान वेतनावर (मूळ वेतन + विशेष भत्ता = किमान वेतन) ४३% दराने लेव्ही देणे बंधनकारक राहील.

नोंदीत सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या अतिकालीक कामाचा मोबदला किमान वेतनाच्या (मूळ वेतन + विशेष भत्ता/महागाई भत्ता) दुप्पट दराने देय राहील.

सबब, मंडळातील सर्व नोंदीत मुख्य मालकांना निर्देशित करण्यांत येते की, वितरीत केलेल्या सुरक्षा कर्मचारी यांचे उपरोक्त तक्त्यामध्ये दर्शविल्यानुसार दि.१.१.२०२४ पासून सुधारीत दराने वेतन व लेव्ही मंडळास अदा करण्यांत यावी.

Security Guards Board For Br. Bombay & Thane District, Sanpada Navi Mumbai

(अशोक ल. डोके)
**कामगार उप आयुक्त व**
**अध्यक्ष**
**सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्हा**

**प्रत पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना :**

**प्रति,**

**मे. ................................................, नों.क्र. ........., युनिट क्र. .........**

.................................................................

.................................................................

.................................................................

**This being a computerised printed copy, signature is not required.*

Scanned with OKEN Scanner